# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

## (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )




## महा मेट्रो नागपूरचा ११ वा स्थापना दिन, यशाचे परिपूर्ण १० वर्ष

## नागपूर मेट्रो रेल फेज - १ प्रकल्प पूर्ण

## नागपूर मेट्रो फेज - २ च्या दिशेने नागपूर मेट्रोची वाटचाल

## दररोज १ लाख पेक्षा जास्त नागरिक मेट्रोने करत आहे प्रवास

नागपूर १७ फेब्रुवारी : २१ ऑगस्ट २०१४ रोजी नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाचे भूमिपूजन व २०१५ पासून नागपूर शहरात मेट्रो रेल प्रकल्पाच्या निर्माण कार्याला सुरुवात झाली. उद्या महा मेट्रो नागपूरचा ११ वा वर्धापन दिन साजरा होणार आहे. २०१५ ते २०२५ - या दहा वर्षाचा प्रवास महा मेट्रोच्या नागपूर मेट्रो रेल प्रकल्पासाठी यशाचे अनेक शिखर गाठणारे ठरले, या वर्षात नागपूर मेट्रो रेल प्रकल्प फेज - १ पूर्ण झाला व फ़ेज - २ च्या निर्माण कार्याला सुरुवात झाली.

या सोबतच नागपूर मेट्रोने अनेक कीर्तिमान स्थापित करत आशियाच नव्हे तर विश्व कीर्तिमान देखील स्थापित केला ज्यामध्ये वर्धा रोड डबल डेकर व्हाया-डक्टची संपूर्ण जगात मेट्रो श्रेणीतील सर्वात लांब डबल डेकर म्हणून अतिशय प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली. नागपूर मेट्रोच्या कार्याचा गौरव इतर राज्यातील शहरांमध्ये देखील होत आहे. या व्यतिरिक्त नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या फेज - २ चा शिलान्यास झाला व फेज - २ कडे नागपूर मेट्रोची वाटचाल व नवीन आव्हानांना करिता घोड दौड सुरु झाली. नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाचा फेज - २ हा ४३.८  कि.मी लांबीचा असून यामध्ये ३२ मेट्रो स्टेशनचा समावेश आहे. नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाचे निर्माण कार्य करतांना नागरिकांच्या  सहकार्यामुळे कार्य जलद गतीने होण्यास मदत झाली. नागपूर मेट्रो ही निश्चितच नागपूरकरांची मेट्रो अशी माझी मेट्रो आहे.

नागपूर मेट्रो, नागपूर शहरातील सार्वजनिक वाहतुकीची पहिली पसंती ठरली, नागपूर मेट्रो आता शहराच्या चारही बाजूने सुरु झाली असून यामध्ये कॉलेज व शाळेत जाणारे विद्यार्थी, नौकरीदार तसे महिला वर्ग मोठ्या प्रमाणात मेट्रोने प्रवास करत असून सकाळी ६ वाजता पासून ते रात्री १० वाजता पर्यंत दर १० मिनिटांनी मेट्रो नागरिकांन करता उपलब्ध आहे.

२०१४

- २१ ऑगस्ट २०१४ रोजी नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोंदी यांच्या हस्ते भूमिपूजन

२०१५ ते २०२५  वर्षात घडलेल्या घडामोडीवर एक नजर :

- १८ फेब्रुवारी २०१५: नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाची स्थापना
- ३१ मे २०१५: नागपूर मेट्रोच्या कार्याची (कार्यारंभ) सुरुवात.
- २३ जानेवारी २०१७ : नागपूर मेट्रोचे महा मेट्रो मध्ये रुपांतर
- २ ऑगस्ट २०१७ : पहिल्या ३ मेट्रो कोच नागपूर शहरात दाखल
- ३० सपटेबर २०१७ : नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाच्या ट्रायल रनला सुरुवात आणि महा कार्ड लाँच
- २१ एप्रिल २०१८ : एयरपोर्ट साउथ ते खापरी दरम्यान जॉय राईड सुरु
- २२ नोव्हेंबर २०१८ : चीन येथील सीआरआरसी डालीयन प्लांट येथून मेट्रो ट्रेन रवाना

- ८ जानेवारी २०१९ : नागपूर मेट्रोच्या रु.११२१६ कोटी खर्चाच्या फेज- २ मेट्रो प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी.

- ७ मार्च २०१९ : पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी द्वारे नागपूर मेट्रो ऑरेंज लाईन(खापरी से सीताबर्डी इंटरचेंज) चे लोकार्पण या प्रसंगी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री श्री.नितिन गडकरी आणि इतर मंत्री गण प्रामुख्याने उपस्थित होते.

- ९ डिसेंबर २०१९ : तेलगांना सरकार ने वारांगल शहराकरिता मेट्रो नियो डीपीआरचे कार्य महा मेट्रोला सौपविले

- २८ जानेवारी २०२० : मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे द्वारे नागपूर मेट्रो अँक्वा लाईन (सिताबर्डी इंटरचेंज ते लोकमान्य नगर) चे लोकार्पण या प्रसंगी केंद्रीय मंत्री श्री.नितिन गडकरी श्री. हरदीप सिंह पुरी आणि इतर मंत्री गण प्रामुख्याने उपस्थित होते.

- २६ फेब्रुवारी २०२० : गड्डीगोदाम येथे महा मेट्रोच्या मल्टी लेयर ट्रान्सपोर्ट सिस्टमच्या निर्माण कार्याला सुरुवात

- ०४ जून २०२० : : महा मेट्रोच्या नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाला आयएसओ १४००१:२०१५ चे प्रमाणपत्र

- ०८ ऑक्टोबर २०२० : मेट्रो भवनला इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलतर्फे सर्वोच्च `प्लॅटिनम' दर्जा

- १३ नोव्हेंबर २०२० : वर्धा मार्गवरील डबल डेकर उडडाणपूलाचे उद्‌घाटन, सदर कार्यक्रमास केंद्रीय मंत्री, रस्ते परिवहन व महामार्ग, आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास, भारत सरकार, राज्याचे गृह मंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री प्रामुख्याने उपस्थित होते.

- १ फेब्रुवारी २०२१ - नागपूर मेट्रो फेज - २ आणि नाशिक मेट्रो नियो प्रकल्पाला क्रमश: ५९७६ व २०९२ करोड रुपये ची घोषणा केंद्रीय वित्त मंत्री श्रीमंती निर्मला सीतारामन यांनी लोकसभा येथे केली.

- ६ एप्रिल २०२१ - उज्जवल नगर, छत्रपती चौक, काँग्रेस नगर आणि धरमपेठ कॉलेज मेट्रो स्टेशन मेट्रो प्रवाश्यान करता सुरु.

- २० ऑगस्ट २०२१ - १.६ किलोमीटर लांब सिताबर्डी-झिरो माईल स्टेशन-कस्तुरचंद पार्क स्टेशन व फ्रिडम पार्कचे उदघाटन झाले. या कार्यक्रमाला तत्कालीन मा मुख्यमंत्री श्री उद्धव ठाकरे आणि केंद्रीय मंत्री मा. श्री हरदीप सिंग पुरी, केंद्रीय राज्यमंत्री मा. श्री. कौशल किशोर (व्हिडियो लिंकद्वारे) आभासी पद्धतीने या कार्यक्रमात सहभागी होते. केंद्रीय मंत्री मा. श्री नितीन गडकरी, तत्कालीन महाराष्ट्राचे नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री मा. श्री एकनाथ शिंदे, ऊर्जा मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालक मंत्री डॉ नितीन राऊत, पशु

संवर्धन, दुग्ध व्यायसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री मा. श्री सुनील केदार, विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा मा. श्री देवेंद्र फडणवीस या सोहळ्याला उपस्थित होते.

- २९ ऑक्टोबर २०२१ - भारत सरकारच्या, गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्रालय द्वारे महा मेट्रोला एक्ससेलन्स इन अर्बन ट्रान्सपोर्टचा पुरस्कार नागपूर मेट्रोला नवी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री गृहनिर्माण आणि शहरी विकास श्री. हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते यांना प्रदान करण्यात आला. मल्टिमॉडेल इंटिग्रेशन उत्कृष्टरित्या अंमलबजावणी करण्याकरिता महा मेट्रोची यामध्ये निवड करण्यात आली.

- ११ जानेवारी २०२२ - महा मेट्रो औरंगाबाद शहराकरिता मेट्रो रेल प्रकल्प व उड्डाणपुलाचा डीपीआर तयार करण्यास सांगण्यात आले

- ४ फेब्रुवारी २०२२ - महा मेट्रोने गड्डीगोदाम (गुरुद्वारा) येथे ८०० टन वजनाचे स्ट्रकचर रेल्वे ट्रॅकवर स्थापित करण्यात आले

- १० जुलै २०२२ - वर्धा मार्गावरील डेबल डेकर पूल व त्यावरील तीन मेट्रो स्टेशन तयार करणारी महामेट्रो व राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरणाची (एनएचएआय) नोंद आशिया बुक ऑफ रेकॉर्ड व इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् ने घेतली

- ७ डिसेंबर २०२२ - वर्धा रोड डबल डेकर व्हाया-डक्टची संपूर्ण जगात मेट्रो श्रेणीतील सर्वात लांब डबल डेकर म्हणून अतिशय प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली.

- ११ डिसेंबर २०२२ - महा मेट्रोच्या नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या सेंट्रल एव्हेन्यू आणि कामठी मार्गावरील मेट्रो रेल्वे सेवेचे उद्घाटन पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडले तसेच नागपूर मेट्रो रेल प्रकल्प फेज - २ चा शिलान्यास देखील या दिवशी पार पडला.

- २ फेब्रुवारी २०२४ - व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते कस्तुरचंद पार्क मेट्रो स्टेशन येथून शेअर्ड ऑटो रिक्षा सेवा सुरु तसेच मनपाच्या वतीने एयरपोर्ट मेट्रो स्टेशन ते एयरपोर्ट पर्यंत बस सेवा सुरु

- १८ जून २०२४ - केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते व्हॅट्सऍप तिकिट सिस्टम सेवा सुरु

- १७ ऑगस्ट २०२४ - ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

- ०५ ऑक्टोबर २०२४ - एलआयसी चौक ते ऑटोमोटिव्ह चौक डबल डेकर उड्डाणपूलाचे केंदीय मंत्री मा.श्री.नितीन गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण

- १७ डिसेंबर २०२४ - नागपूर मेट्रो फेज-II साठी 200 मिलियन USD चा सामंजस्य करार मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करारावर स्वाक्षरी
- २० डिसेंबर २०२४ - इंदोरा मेट्रो स्टेशन येथून प्रवासी सेवा सुरु
- २८ जानेवारी २०२५ - सोमलवाडा (मनीष नगर) आरयुबीचा लोकार्पण समारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न..